

सौजन्याने वागल्यास मन:शांती मिळते.


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार ०२ जुले २०२५ | अंक १९४ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



SUN Tourism घर से घर तक
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
:- अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555


# कोकण, घाटमाथ्यावर पावसाचा जोर वाढणार, कोणत्या जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट?

सध्या महाराष्ट्रात सर्वत्र पावसाची रिपरिप सुरु आहे. त्यातच आता हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कोकण आणि घाटमाथ्यावर पावसाचा जोर वाढणार आहे. त्यामुळे ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. उर्वरित कोकण, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार सरी कोसळतील. तसेच विजांसह पावसाची शक्यता असल्याने यलो अलर्ट देण्यात आला आहे. कोकण आणि घाटमाथ्यावर पावसाचा जोर कायम पुणे वेधशाळेचे हवामान शास्त्रज्ञ एस. डी. सानप यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या कोकण आणि घाटमाथ्यावर पावसाचा जोर कायम आहे. मात्र राज्याच्या इतर भागांमध्ये अजूनही जोरदार पावसाची प्रतीक्षा आहे. आज २ जुलै २०२५ कोकण आणि घाटमाथ्यासह पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक घाट परिसरत, पुणे घाटमाथा, सातारा घाटमाथा आणि



कोल्हापूर घाट परिसर यांसारख्या भागांमध्ये जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे. याशिवाय उर्वरित कोकण, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार सरी तसेच विजांसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे या भागांसाठ यलो अलर्ट देण्यात आला आहे. यामध्ये पालघर, ठाणे, मुंबई, धुळे, जळगाव आणि चंद्रपूर जिल्ह्यांचा समावेश आहे. तसेच कोकण आणि घाटमाथ्यावर काही ठिकाणी मुसळधार पाऊस सुरु आहे. त्यामुळे

## मराठवाडा-विदर्भात विजांसह पावसाची शक्यता

तसेच मध्य महाराष्ट्राच्या घाटाकडील भागांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळत आहेत. तर उर्वरित राज्यात ढगाळ हवामानासह पावसाची उघडीप पाहायला मिळत आहे. तसेच उर्वरित राज्यात हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. राज्याच्या इतर भागांमध्ये मात्र जोरदार पावसाची अजूनही प्रतीक्षा आहे. पालघर, ठाणे, मुंबई, धुळे, जळगाव आणि चंद्रपूर जिल्ह्यांत जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांसह पावसाची शक्यता असल्याने सतर्कतेचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

अतिवृष्टीची नोंद झाली आहे. मराठवाडा-विदर्भात विजांसह पावसाची शक्यता तसेच मध्य महाराष्ट्राच्या घाटाकडील भागांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळत आहेत. तर उर्वरित राज्यात ढगाळ हवामानासह पावसाची उघडीप पाहायला मिळत आहे. तसेच उर्वरित राज्यात हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. राज्याच्या इतर भागांमध्ये मात्र जोरदार पावसाची अजूनही प्रतीक्षा आहे. पालघर, ठाणे, मुंबई, धुळे, जळगाव आणि चंद्रपूर जिल्ह्यांत जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांसह पावसाची शक्यता असल्याने सतर्कतेचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. पुणे जिल्ह्यासाठी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. जून महिन्यात ताम्हिणी येथे चेरापुंजीपेक्षाही अधिक पावसाची नोंद झाली आहे. १ जून ते १ जुलै या कालावधीत ताम्हिणी येथे २,५१५ मिलीमीटर पाऊस पडला आहे.

# समाज हा वेठबिगारीच्या विळख्यातून मुक्त झाला पाहिजे-प्रमुख जिल्हा न्या.आनंद यावलकर

बीड-प्रतिनिधी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व आय.जे.एम. यांच्या संयुक्त विदयमाने दिनांक २९ जून २०२५ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता जिल्हा व सत्र न्यायालय, बीड येथे वेठबिगारी व मानव तस्करी व नालसा योजना या कायदयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेचे उदघाटन मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड श्री.आनंद एल.यावलकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बीड मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी कार्यशाळेसाठी उपस्थित होते. तर बीड जिल्हयातील तालुका न्यायालयातील न्यायिक अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते. सदर कार्यशाळेचे प्रास्ताविक जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती रेणूका सातव यांनी केले. सदर कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी अध्यक्ष आनंद यावलकर यांनी सागितले की, वेठबिगारी संपली पाहिजे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने स्पेशल सेलच्या माध्यमातून गतवर्षापासून २८ वेठबिगारांची वेठबिगारीतून मुक्तता केली असून त्यांचे पुनर्वसनाचे काम सुरू आहे. सदर कार्यक्रमामध्ये आय. जे.एमच्या ॲड.रेनिटा मेनजिस यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये वेठबिगारीचे विविध कायदे, त्यांच्याकरिता असलेल्या शासनाच्या विविध योजना व त्या संबंधीचे असणारे केस स्टडी या विषयी मार्गदर्शन केलेण् त्यानंतर आय.जे.एम.च्या कासेन्द्रा फर्नांडिस यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये पिडीतांना सक्षम करणेए पीडितांना कोर्टामध्ये कसे हजर करावे या बाबतची महत्वपूर्ण यावेळी सांगितली. तसेच आय.जे.एमचे ॲड.ब्रिटो नादर यांनी आपल्या मार्गदर्शपर भाषणामध्ये असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी असलेली नालसा स्कीम २०१५ बाबत महत्वाची माहिती यावेळी दिली. सदर कार्यक्रमास बीड येथील स्पेशल सेलचे सर्व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्पेशल सेलचे सदस्य तथा अधिकार मित्र श्री.तत्वशिल कांबळे यांनी केले. कार्यक्रमासाठी बाल कल्याण समितीचे अशोक तांगडे. ॲड. विकास बडे. ॲडण्शिला पठत. मिथून जोगदंड व इतर स्पेशल सेलचे सर्व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती. रेणूका सातव यांनी मानले

# रवींद्र चव्हाण भाजपचे नवे प्रदेशाध्यक्ष

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपला नवीन प्रदेशाध्यक्ष मिळाला असून रवींद्र चव्हाण यांच्या नावाची अधिकृत घोषणा झाली. वरळीमध्ये झालेल्या जय्यत कार्यक्रमामध्ये रवींद्र चव्हाणांचे नाव जाहीर करण्यात आलं. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांच्यासह प्रमुख भाजप नेते उपस्थित होते. रवींद्र चव्हाण यांची भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. रवींद्र चव्हाण हे भाजपचे नावाने बारावे अध्यक्ष असतील. मात्र ते विरोधकांचे राजकीय तेरावे घालतील, विरोधकांचे बारा वाजवल्याशिवाय राहणार नाही असं मुंबईचे अध्यक्ष आशिष शेलार म्हणाले. रवींद्र चव्हाण हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू नेते म्हणून ओळखले जातात. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीचे नेते अशीही त्यांची ओळख आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून काम केलं. तसेच देवेंद्र फडणवीस यांचे सरकार सत्तेत आल्यानंतर त्यांनी भाजपचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून काम पाहिलं. चंद्रशेखर बावनकुळे यांच्यानंतर ते भाजपचे १२ वे अध्यक्ष म्हणून काम पाहतील. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जास्तीत जास्त लोकप्रतिनिधी निवडून आणणे आणि भाजपला एक नंबरचा पक्ष बनवणे हे त्यांच्यासमोरील आव्हान असेल.

# बीड लैंगिक अत्याचार प्रकरणात एसआयटी स्थापन करण्यात येणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



मुंबई, दि. १ : बीड येथील अल्पवयीन मुलीच्या लैंगिक शोषण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली.सदस्य चेतन तुपे यांनी यासंदर्भातील मुद्दा उपस्थित केला होता. मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, वरिष्ठ महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ङ्गएसआयटीफ्ची स्थापना करून या प्रकरणाची कालबद्ध चौकशी करण्यात येईल. तसेच दोषींवर कठोर कारवाई करून दोषींना पाठीशी घालणाऱ्या सर्वांवरही कठोर कारवाई करण्यात येईल.

****

# कृत्रिम पावसाचा प्रयोग तात्काळ करा - राजेंद्र आमटे
# पिके करपू लागली, दुबार पेरणीचे संकट !

बीड /प्रतिनिधी : जिल्ह्यात यावर्षी जून पेक्षा मे महिन्यातच पाऊस जास्त झाला मात्र शेतकऱ्यांनी जून महिन्यात पेरणी केली पेरणी केल्यानंतर पावसाने दडी मारली असून पिके करपू लागली आहेत आठ ते दहा दिवसात पाऊस न आल्यास दुबार पेरणीचे संकट गडद झाले असून शासनाने त्वरित कृत्रिम पावसाचा प्रयोग राबवावा अशी मागणी शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आम टे यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेले निवेदनात केली आहे.बीड जिल्हा हा दुष्काळाने वारंवार होरपळत आहे याचा फटका सर्वाधिक शेतकऱ्यांना बसत असून कधी आसमान येते कधी सुलतानी संकटाने शेतकरी म ेटाकुटीला आला आहे. यावर्षी मे महिन्यातच पेरणीयोग्य पाऊस झाला होता, परंतु शेतकऱ्यांनी पेरणीची योग्य वेळ नसल्याने जून महिना पेरणीसाठी निवडला लाखो रुपयांचे खत, बी बियाणे शेतकऱ्यांनी मातीत पेरली असून पेरणीनंतर पावसाने मात्र दडी मारली आहे त्यामुळे कवळी पिके सुकू लागली आहे.



अशा परिस्थितीत पावसाची नितांत गरज असून येत्या आठ ते दहा दिवसात दमदार पाऊस न झाल्यास दुबार पेरणीचे संकट अधिक गडद झाल्याचे दिसून येत आहे त्यामुळे शासनाने त्वरित उपाययोजना करून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कृत्रिम पावसाचा प्रयोग जिल्ह्यात राबवावा अशी मागणी शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. यावेळी राजेंद्र आमटे, तालुकाध्यक्ष पंडित माने,धर्मराज मागदे, दत्ता सुरवसे, नितीन आगाम, भीमराव कुटे, माऊली शिंदे, रविंद्र नागरगोजे, आश्रुबा नागरगोजे, समाधान जम ाले, दादासाहेब सोनवणे, सह आदी शेतकरी उपस्थित होते.

# शिवसंग्रामी मावळ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा-सदाभाऊ खोत



बीड-प्रतिनिधी महाराष्ट्र राज्याचे माजी कृषी राज्यमंत्री तथा रयत क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आ.सदाभाऊ खोत बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी शिवसंग्राम संस्थापक अध्यक्ष लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या स्मृतीस्थळाचे दर्शन घेतले. मी बीड जिल्ह्यात आल्यानंतर आज दिवसाची सुरुवात सर्वप्रथम लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांना अभिवादन करून केली असल्याचे सुतोवाच त्यांनी यावेळी केले. लोकनेते विनायकराव मेटे साहेबांच्या संपर्कात आलेला प्रत्येक माणूस हा ते आपलासा करायचे राजकीय व्यासपीठावर ते अनेकांवर असूढ ओढायचे परखड मत मांड्याचे परंतु वयक्तिक मैत्री ते टिकवायचे असे दोस्तीच्या दुनियेतील राजा माणूस अशी त्यांची ओळख होती. ज्यावेळी आम्ही महायुतीच्या सर्व बैठका या त्यांच्या पुढाकाराने आणि नियोजनात होत असत. मराठा आरक्षण प्रश्न विधीमंडळात अत्यंत पोटतिडकीने फक्त मेटे साहेबच मांडत होते.

# लोकनेते विनायकराव मेटे यांच्या जयंती निमित्त अभिवादन करण्यास जनसागर लोटला

बीड-प्रतिनिधी लोकनेते विनायकराव मेटे यांची जयंती दि. ३० जून सोमवार रोजी त्यांच्या आठवणींना उजाळा देत साजरी करण्यात आली. सकाळपासूनच अभिवादनासाठी चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. सकाळी ११ वाजता सामुदायिक अभिवादन कार्यक्रम बीड येथील लोकनेते विनायकराव मेटे स्मृतीस्थळी पार पडला यावेळी सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह, शिवसंग्रामचे कार्यकर्ते, पदाधिकारी आणि मेटे साहेबांवर प्रेम करणारे असंख्य चाहते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंती निमित्त त्यांचे स्मरण व्हावे यासाठीआज सकाळपासूनच गावो - गावी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते वस्ती , वार्ड, तांड्यावर त्यांना अभिवादन करत जयंती साजरी करण्यात आली. गावातील ग्रामपंचायत कार्यालय, सामाजिक सभागृह, वाचनालय या ठिकाणी नागरिकांच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले .तर बीड येथील त्यांच्या स्मृतीस्थळी त्यांना सर्वपक्षीय सामुदायिक अभिवादन करण्यात आले. लोकनेते विनायकराव मेटे हे फक्त जिल्ह्याचे नेते नसून त्यांनी उभ्या महाराष्ट्र भर आपल्या सामाजिक कार्यातून दीनदलित, उपेक्षित, वंचित यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले होते. त्यांच्या कार्याची गणना करणे अशक्य आहे. सामूहिक विवाह सोहळ्यातून त्यांनी अनेकांची संसार थाटले , कोविड काळात सर्वसामान्यांना मदतीचा हात दिला, दुष्काळात शेतकऱ्यांच्या



पाठीशी खंबीर पने उभा राहिले, व्यसमुक्तीसाठी लढा उभा केला , युवकांसाठी रोजगार मेळावे आयोजित केले. लोकनेते विनायकराव मेटे यांनी आपली उभी हयात समाजासाठी अर्पण करत समाजाच्या लढ्यासाठी घालवली. मराठा, मुस्लिमधनगर आरक्षण मिळावे या मागणीसाठी त्यांनी जीवाची पराकाष्टा केली आपण शेवटच्या श्वासापर्यंत मराठा आरक्षण लढा चालू ठेवणार अशी भीष्म प्रतिज्ञा त्यांनी केली होती आणि त्यांचा शेवटही मराठा आरक्षणावर होवू घातलेल्या मु ंबई येथील बैठीकाला जाताना झाला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बुधवार ०२ जुले २०२५
https://lokaarambh.com



# संपादकीय

## देशी वृक्षांची लागवड करा

मागील काही वर्षात शहरात सिमेंटच्या जंगलाने गर्दी केली आहे. मोठमोठ्या इमारती आणि टॉवर्स उभे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली आहे. जितक्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली तितक्या प्रमाणात वुक्ष लागवड करण्यात आली नाही. परिणामी पर्यावरणाचे संतुलन बिघडले. त्याचा परिणाम तापमान वाढीवर झाला. तसेच बेसुमार वृक्षतोडीमुळे अनियमित पाऊस, उष्णता अशा संकटांना तोंड द्यावे लागले. यावर मात करण्यासाठी गेल्या काही वर्षापासून महाराष्ट्र सरकारने वृक्षारोपणाची मोहीम हाती घेतली आहे. दरवर्षी या मोहिमेअंतर्गत लाखो वृक्षांची लागवड केली जाते. या मोहिमेत शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, विविध सामाजिक व सेवाभावी संस्था, तरुण मंडळांनी यात हिरीरीने भाग घेतला. नागरिकांनीही आपल्या घराजवळ, बागेत, शेतात मोकळ्या जागेत, माळरानावर वृक्षारोपण केले. यावर्षीही ही मोहीम मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येणार आहे. या वृक्षारोपण मोहिमेत परदेशी वृक्ष मोठ्या प्रमाणावर लावण्यात येतात. जास्तीतजास्त देशी वृक्षांची लागवड करणे आवश्यक असताना ज्या परदेशी वृक्षांची आपल्याला आवश्यकता नाही ; त्यांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. परदेशी वृक्षांमुळे जैवविविधता मोठ्या प्रमाणावर नष्ट होऊ लागली आहे. त्याचप्रमाणे वाढते तापमान, वातावरणातील बदल दूर करण्यातही परदेशी वृक्ष अपयशी ठरत आहे. देशी वृक्षांमुळे पावसाचे पाणी भूगर्भात टिकून राहते. विदेशी वृक्षांमुळे जमिनीची पाणी टिकवून ठ`वण्याची क्षमता नाहीशी होते. दुष्काळामागे हे ही एक महत्वाचे कारण आहे. विदेशी झाडांच्या आम्लयुक्त पानांमुळे जमिनी नापीक होत आहे. विदेशी झाडांच्या फुलात परागकण नसतात त्यामुळे त्यावर फुलपाखरे किंवा भु ंगे यासारखे कीटक येत नाहीत. विदेशी झाडांच्या पानांनी आणि सावलीने जमीन निकृष्ट होत आहे. या वृक्षांच्या फांद्यांचा आणि बु ंद्याचा काहीही उपयोग होत नाही. विदेशी वृक्षांमुळे रातकिडे, वटवाघूळ, घारी, गिधाडे, चिमण्या कावळे, घुबड, कबुतरे, पोपट यासारखी सरास् दिसणारे पक्षी दिसेनासे झाली आहेत. एकंदरीत अशा विदेशी वृक्षांमुळे होणाऱ्या परागकण प्रक्रियेला आणि पक्षांद्वारे होणाऱ्या बिजप्रसाराच्या कामाला खीळ बसत असून कीटक, किडे, पक्षी जोडणारी निसर्गाची अन्न साखळी कुमकुवत होत आहे. देशी वृक्ष आपल्या जंगलात किंवा परिसरात पर्यावरणाचा समतोल साधत असतात. त्यांच्या आस्तित्वशी जुळवून घेतलेली, त्यावर जोपासली जाणारी सजीव व्यवस्था असते. या सजीव अवस्थेत मनुष्य, पशुपक्षी, कीटक सामावले असतात. देशी वृक्षांमुळे पक्षांना कीटकांना, किड्यांनाही निवारा मिळतो. विघटन झालेल्या पालापाचोळ्याच्या खतातून निर्माण होणारी पोषकद्रव्ये पुन्हा वृक्षाकडे पाठवण्याचे काम वृक्षांची दूरवर पसरलेली मुळे करत असतानाच जमिनीत खोलवर जाऊन ती जमिनीवरच्या मातीला धरून ठेवतात. विविध कीटकांना, किड्यांना आणि सरपटणाऱ्या जीवांना अशी जमीन उपयुक्त ठरते आणि एक परिपूर्ण पर्यावरण निर्माण होते. विदेशी वृक्ष पुरेसा ऑक्सीजनही देत नाहीत. देशी वृक्ष जितका ऑक्सीजन देतात तितका ऑक्सीजन विदेशी वृक्ष देत नाहीत. काही देशी वृक्ष तर चोवीस तास ऑक्सीजन देतात. वातावरणातील ऑक्सीजन कमी होऊ द्यायचा नसेल तर देशी वृक्षांचीच लागवड करावी. वड, पिंपळ, कडुनिंब, आवळा, चिंच, फणस, आंबा, बेल, कदंब, पळस या वृक्षांची जास्तीतजास्त लागवड करण्यात यावी. देशी वृक्ष औषधी असतात शिवाय हे वृक्ष मोठे झाल्यास त्याची दाट व थंडगार सावलीही मिळते त्यामुळे जास्तीतजास्त देशी वृक्षांची लागवड करायला हवी

## जपान जागतिक अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये उत्कृष्ट रँकिंग मिळवणाऱ्या अनन्या काशिनाथ मोरेचा मा. जिल्हाधिकारी मा. विवेक जॉन्सन यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सत्कार.

### मास्टर अबॅकस अनन्या काशिनाथ मोरेचा विजयी ट्रॉफी देऊन मा.जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार संपन्न.



विद्यार्थ्यांचा गणितामधील आवड निर्माण होऊन गणिताबद्दलची मनात असलेली भीती नष्ट होऊन अनेक क्लिष्ट अशा गणितीय पद्धती सोप्या पद्धतीने सोडवल्यासाठी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, स्मरणशक्ती यांचा विकास करण्यासाठी अबॅकसचा उपयोग स्पर्धेसाठी केला होतो असे बीडच्या जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले आहे

बीड (प्रतिनिधी) शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होतो असे माननीय जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अबॅकस विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले आहे. शहरातील अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. तैवान चेंबर्स ऑफ कॉमर्स, पेमा इंटरनॅशनल अबॅकस असोसिएशन, सीमास अबॅकस असोसिएशन ओसाका , स्किल डेव्हलपमेंट आणि इंटरनॅशनल स्तरावरील ऑनलाइन अबॅकस चॅम्पियनशिप आणि आंतरराष्ट्रीय अबॅकस असोसिएशन यांच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय स्तरावरील फ्लॅश अबॅकस स्पर्धा दहा मिनिटांच्या १० जून २०२५ रोजी जाहीर झालेल्या निकाला प्रमाणे अनन्या काशिनाथ मोरेने सर्वोत्कृष्ट ट्रॉफी, विजयी मोमेंटो ट्रॉफी बक्षीस स्वरूप, मानद उडन सायटेशन आणि मेडल मिळालेलं असून अनन्या काशिनाथ मोरेचा बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी मा. विवेक जॉन्सन यांच्या हस्ते जागतिक अबॅकस चॅम्पियन म्हणून सत्कार संपन्न झालेला आहे या स्पर्धेमध्ये भारतासह, नेपाळ, श्रीलंका, यु एस ए अशा जगातील एकूण तीन हजार विद्यार्थ्यांपैकी ज्युनियर लेवलच्या स्पर्धेमध्ये अनन्या काशिनाथ मोरेची जागतिक स्तरावर निवड झालेली आहे अनन्या काशिनाथ मोरेने इंटरनॅशनल स्पर्धेमध्ये सहभाग घेत उत्कृष्ट विजयी ट्रॉफी मिळवल्यामुळे इंटरनॅशनल अबॅकस स्पर्धेमध्ये उत्तर अमेरिका स्तरावरील प्रतिष्ठित समजले जाणारी अबॅकस इंटरनॅशनल सर्वोत्कृष्ट जागतिक प्रथम उत्कृष्ट स्पर्धक अनन्या काशिनाथ मोरेची निवड करण्यात आलेली आहे. अनन्या काशिनाथ मोरेने फक्त दहा मिनिटांमध्ये अगदी बरोबर गणिते सोडवून पैकीच्या पैकी मार्क्स मिळवून ऐतिहासिक विक्रम केलेला आहे. गेल्या चार ते पाच महिन्यापासून सतत प्रयत्न करत असल्यामुळे तसेच पालकांनी, शिक्षकांनी सतत योग्य मार्गदर्शन करून अनन्या मोरेला यश प्राप्त करण्यास सहकार्य केलेली आहे. अबॅकस तथा वैदिक गणित मार्गदर्शक डॉ. एस ए घोडके यांनी सतत गणितामधील असलेल्या अडचणी दूर करण्यास प्रयत्न केलेले आहे. अबॅकस स्टडी सेंटरचे प्रमुख डॉ. घोडके एस ए. अभिनंदन केले असून उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिलेल्या आहेत. समाजातील सर्व स्तरांमधून अनन्या काशिनाथ मोरेचे अभिनंदन होत असून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत असे जिल्हा अबॅकस वितरक एस. ए. घोडके यांनी सांगितले.

## बीडमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम

### डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून अ.भा.म. नाट्य परिषद, के.एस.के. महाविद्यालयाचा उपक्रम

बीड (प्रतिनिधी) दि.१ : ज्येष्ठनागरिकांच्या आयुष्यात आनंदाची रंगत निर्माण करण्यासाठी आणि त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देण्यासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची बीड शाखा व सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू महाविद्यालयातील नाट्यशास्त्र व संगीत विभागाच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी बीडमध्ये येत्या दि.१७ जुलै रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या बीड शाखा अध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून ज्येष्ठ नागरिकांसाठी उपक्रमाचे दरवर्षी आयोजन केले जाते. यामध्ये गीत गायन, नृत्य, नाटिका, काव्यवाचन, स्टँडअप कॉमेडी आदी कार्यक्रमांचा समावेश असणार आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात आनंद निर्माण व्हावा, त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, तसेच तरुण वयात जोपासता न आलेले छंद साकार करण्यासाठी या



कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी आपली नावे नोंदवावीत, त्यासाठी डॉ.दुष्यंत रामटेके ९७६७३५५२९४, डॉ.संजय पाटील देवळाणकर ९४२२२९५३१४, डॉ. राहुल सोनवणे ९८२२५७७६७१, डॉ. दीपक जमधाडे ८८८८८५०३५८, डॉ.अनिता शिंदे ७२७८३०५०५०, प्रा.विजय राख ९८३३३४५८०९, सुरेश थोरात ९४२२९११०९० यांच्याशी संपर्क करावा, असे संयोजकांनी म्हटले आहे.

## शिक्षणच तुमची परिस्थिती बदलू शकते-सुदर्शन भालेराव

माजलगाव-प्रतिनिधी शिक्षणच तुमची परिस्थिती बदलू शकते, त्यासाठी तुम्हाला शिकावं लागेल. परिस्थिती बिकट आहे म्हणून मागे न हटता आपले ध्येय गाठा, असे आवाहन भारत विकास ग्र ुप कंपनीचे राष्ट्रीय प्रशिक्षण प्रमुख श्री. सुदर्शन भालेराव यांनी माजलगाव विकास प्रतिष्ठान तर्फे आयोजित शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमात विद्यार्थ्यांना केले. माजलगाव विकास प्रतिष्ठान, लोकनेते सु ंदरराव‌जी सोळंके नागरी सहकारी पतसंस्था माजलगाव आणि सिंदफणा पब्लिक स्कूल माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात आधार प्रकल्पातील मुले-मुलींना शैक्षणिक साहित्य वाटप यावर्षी सुद्धा यशस्वीरित्या करण्यात आले. सविस्तर वृत्त असे की, माजलगाव विकास प्रतिष्ठान मागील १८ वर्षांपासून आधार प्रकल्पातील गरजू मुले मुलींसाठी नियमितपणे शैक्षणिक साहित्याचे वाटप, शैक्षणिक सहली, दिवाळी निमित्त फराळाचे वाटप आणि किशोरवयीन मुले मुलींसाठी कार्यशाळांचे आयोजन अशा विविध उपक्रम राबवत आहे. या वर्षीच्या कार्यक्रमात जवळपास ४०० मुले-मुलींना शैक्षणिक साहित्य वितरित करण्यात आले. परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला त्यामध्ये शिंदे अक्षरा राजू (वर्ग दहावी)- ८२ टक्के, देशमाने महानंदा ८४ टक्के , रखमाजी गोरे - ९१ टक्के, आकांक्षा वारकरी - ८१ टक्के, आकांक्षा शिंदे - ८२ टक्के या विद्यार्थ्यांना शुभेच्छा आणि रंगीत ड्रे स देऊन सन्मानित करण्यात आले.

## स्मार्ट अंगणवाड्या फक्त कागदावरच; पावसाळयात गळक्या छिद्र पडलेल्या पत्र्यांचा निवारा तर पिण्याच्या पाणी व स्वच्छतागृहांची वानवा चिमुकल्यांची परवड सुरूच :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.०१ )एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महिला व बालकल्याण विकास विभागाच्या माध्यमातून अंगणवाडी योजना राबविण्यात येते.या योजनेंतर्गत अंगणवाडीतील शुन्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांचा भौतिक, शारीरिक आणि सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्याचे ध्येय आहे.या मुलांना पोषणयुक्त आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, आरोग्य शिक्षण, औपचारिक शालेय शिक्षण केंद्रातुन देण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र स्मार्ट अंगणवाडी कागदावरच राहिल्या असुन कंत्राटदार पोसण्यासाठी अनावश्यक गोष्टींवर भरमसाठ खर्च होत असतानाच मुलभूत सुविधा मलांना सुरक्षित निवारा,पिण्याचे शुद्ध पाणी, वीजपुरवठा तसेच दरवाजे, खिडक्या दुरूस्ती व स्वच्छतागृहांची वानवा असल्याचे आढळून येते. संबंधित प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांना प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदनाद्वारे मागणी केली होती. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला होता मात्र शासन आणि प्रशासन स्तरावर अद्याप याची अंमलबजावणी झाली नसुन प्रशासनाला याचे गांभीर्य दिसून येत नसल्याची खंत डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली.पस्मार्ट अंगणवाड्या कागदावरच ; वीजपुरवठाच नसल्याने एलईडी टीव्ही,वाटर प्युरीफायर धुळखात पडुन , कंत्राटदार पोसण्यासाठीचा अट्टाहास:- डॉ.गणेश ढवळे स्मार्ट अंगणवाडीच्या दृष्टीने अत्यावश्यक ई लर्निग सुविधा ज्यामध्ये एलईडी टीव्ही तसेच शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय म्हणून लावण्यात आलेले वाटर प्युरीफायर अंगणवाडी मध्ये वीजपुरवठाच नसल्याने धुळखात पडुन असुन केवळ कंत्राटदार पोसण्यासाठी अंगणवाडीला एलईडी टीव्ही आणि वाटर प्युरीफायरचा पुरवठा करण्यात आला आहे का? असा संतप्त सवाल डॉ.



गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

मराठवाड्यात ६३८ अंगणवाड्यांची कामे रखडली तर ९५ कामे वर्षं उलटुनही सुरूच नाहीत ; ३७ कोटींचा निधी मंजूर केला होता कुपोषण मुक्तीसाठी काम करणाऱ्या ग्रामीण भागातील १३०० अंगणवाड्या स्वतःची इमारत विना उघड्यावर झाडाखाली, समाज मंदिरात, पत्र्याच्या शेडमध्ये,किरायाच्या रूममध्ये भरतात. मराठवाड्यात मागील वर्षी ६३८ अंगणवाडी ईमारती मंजुर करण्यात आल्या होत्या.या इमारतींना मंजुरी दिल्यानंतर कामाचे कार्यारंभ आदेशही देण्यात आले होते.परंतु कंत्राटदारांनी या कामांना गती दिली नाही. एक वर्षापूर्वी मंजूर झालेल्या कामांची प्रगती केवळ १४.८९ टक्के आहे अर्थातच यात ४४२ कामे सुरू झाल्याचे कागदावर दाखविले जात असुन ९५ कामे तर अद्याप सुरुच झालेली नाहीत.या कामांसाठी शासनाने ३७.९६ कोटी रूपयांचा निधी मंजूर केलेला आहे.सदरील कामे रखडली असतानाही शासन स्तरावरून याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही हे विशेष.

अंगणवाडी कामांची स्थिती
पुर्ण - प्रगती - सुरू -नाही
बीड -७५-७७-००
संभाजीनगर -०२-२८-२०
जालना -०४-५४-००
परभणी -१०-११४-००
हिंगोली -००-०७-०१
नांदेड -००-१०७-४४
लातुर -०४-२२-००
धाराशिव -००-३३-३०

जिल्हा निहाय मंजुर अंगणवाड्या आणि अखर्चित (निधी) लाखात
संभाजीनगर - ५०- ५५०.७०
बीड -१५२-१२१०
जालना -५८-५३०.९७
हिंगोली -०८-१६.९६
परभणी -१२४-४६०
नांदेड -१५७-७११.७१
लातुर -२६-२९२.५०
धाराशिव -६३-६८.४२

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ०२ जुले २०२५
https://lokaarambh.com



## आषाढी वारीत महाएनजिओ फेडरेशन व विजयकुमार पाटील गौरक्षण संस्थेच्या दिंडीचा उत्साही सहभाग



(प्रतिनिधी) – संतांच्या पावन परंपरेनुसार आषाढी वारीला पंढरपूरकडे मार्गस्थ झालेल्या विविध दिंड्यांमध्ये महाएनजिओ फेडरेशन व विजयकुमार पाटील गौरक्षण व बहुद्देशीय ग्रामीण विकास संस्था यांच्या नेतृत्वाखालील दिंडीने यंदाही पारंपरिक भक्तिभाव आणि उत्साहात सहभाग नोंदवला. या दिंडीची सुरुवात संतसंग्रामभूमी आळंदी येथून झाली असून, मागील ३२ वर्षांपासून ही परंपरा अखंडपणे सुरु आहे. यंदाही दिंडीचे संचालन हभप. विलासराव ज्ञानबा पळसकर व हभप. झांबरे महाराज यांच्या आध्यात्मिक मार्गदर्शनाखाली करण्यात आले. फलटण ते बरड मार्गावर या दिंडीचे भव्य स्वागत करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष विजयकुमार पाटील पळसकर यांच्या वतीने हभप. झांबरे महाराज, हभप. विलासराव पळसकर (सप्तरुशी संचालक) व सौ. विमलबाई पळसकर यांचा पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. दिंडीतील सर्व वारकरी पारंपरिक भगव्या वेशभूषेत, कपाळी टिळा लावून, भगव्या पताका घेऊन, "ज्ञानोबा-तुकाराम"चा जयघोष करत भक्तिरसात न्हालेलं वातावरण निर्माण करत होते. दिंडीत प्रताप कऱ्हाळे, बंडू अण्णा कऱ्हाळे, बंडू सुखदेव कऱ्हाळे, गजानन सुर्वे, माणिक लोंढे, किसन आखरे (दुकानदार), हभप. शेडगे आबा (माजलगाव), दीपक जायभाये यांच्यासह अनेक भाविक सहभागी झाले होते. यावेळी संस्थेचे चालक विजय पळसकर यांनी सर्व वारकऱ्यांना मिठाई व लाडूचे वाटप करून प्रेमाने सेवा केली. या भाविकतेने ओतप्रोत भरलेल्या भक्तिसोहळ्यात हजारो भाविक उपस्थित होते. "पांडुरंगाचा विजय असो" चा जयघोष करत सर्व वारकरी विठुरायाच्या भेटीसाठी आळंदीहून पंढरपूरकडे वाटचाल करत आहेत.

## चकलांबा पोलिसांच्या छायेत अवैध धंद्यांना उधाण; वाळू माफियांपासून गुटखा–जुगार पर्यंत मुक्तसंचार, नागरिकांमध्ये संताप

प्रतिनिधी चकलांबा गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलीस ठाणे हे तालुक्यात अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. मात्र गेल्या काही म हिन्यांपासून या ठाण्याच्या हद्दीत विविध अवैध धंदे पुन्हा डोकं वर काढताना दिसत आहेत. गुटख्याचा खुलेआम व्यापार, जुगार, अवैधरित्या वाळू उपसा, दारू विक्री अशा अनेक बेकायदेशीर धंद्यांनी चकलांबा परिसराला अक्षरशः वेढलं असून, स्थानिकांच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सुरुवातीला सपोनि संदीप पाटील यांनी पदभार स्वीकारताच दोन–तीन महिन्यांत काही प्रमाणात कारवाई करून बेकायदेशीर धंद्यांना लगाम घातला होता. मात्र ही कारवाई तात्पुरतीच ठरली. आज पुन्हा गुटखा विक्रेते, जुगारी, वाळू माफिया आणि दारू विक्रेते म ोकळेपणाने आपला धंदा चालवत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. रात्रीच्या वेळी टिप्परचा धिंगाणा चकलांबा परिसरात वाळूचा अवैध उपसा सर्रास सुरु असून, रात्रीच्या वेळी दारू पिऊन टिप्पर चालवले जात असल्याने शेतकऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.एका शेतकऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले शेतात रात्रभर राखण करावी लागते, कारण टिप्पर चुकून शेतात शिरले तर नुकसान भरून कोण देणार? या वाळूच्या गाड्यांची किंमत ३८ ते ४० हजार रुपये प्रतिट्रकपर्यंत जात असल्याची माहिती मिळत आहे. एवढ्या मोठ्या रकमेचा हप्ता कुठे जातो, यावरून पोलीस यंत्रणेतील दलाल व माफियांमध्ये चांगलाच संगनमत असल्याची जोरदार चर्चा आहे. पोलिसांची कारवाई फक्त कागदावर? सपोनि संदीप पाटील यांना विचारले असता, त्यांनी सांगितले आम्ही वेळोवेळी कारवाई करतो. म ात्र नागरिकांचा आरोप आहे की ही कारवाई फक्त पोलीस ठाण्याच्या बाहेरच होते, गावातील मुख्य बाजारपेठ, गल्ली–बोळात म ात्र गुटखा विक्री, जुगार आणि दारूचे व्यवहार थेट पोलिसांच्या नजरेसमोर सुरू आहेत.




त्यामुळे पोलीस आणि माफियांमध्ये काही ठरविक आर्थिक व्यवहार झाले असल्याची शंका बळावली आहे. तसेच एका दुकानदाराने सांगितले गावात गुटखा पुन्हा खुलेआम विकला जातोय. पोलिसांनी सुरुवातीला धसका दाखवला, आता मात्र काहीच होत

### वरच्या अधिकाऱ्यांनी लक्ष घाला – नागरिकांची मागणी

चकलांबा परिसरातील शेतकरी, महिला, व्यापारी यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे मागणी केली आहे कीचकलांबा पोलीस ठाणे हे तालुक्यात आदर्श ठरावे अशी अपेक्षा असताना, पोलीसच दुर्लक्ष करत असल्याने गावकऱ्यांमध्ये असंतोष आहे. बीड जिल्हा पोलीस अधीक्षकांनी याची गंभीर दखल घ्यावी आणि स्वतंत्र पथक नेमून तपास करावा, अन्यथा कायद्याचा धाक पूर्णपणे संपेल आणि अवैध धंद्यांचे राज्य स्थिरावेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

## गृहमंत्री ना सवाल, विजय पवार हा पोलीस प्रशासनाचा जावई आहे का? :– शेख युनूस

बीड (प्रतिनिधी) बीड शहरात एकच खळबळ उडालेली आहे.शहरातच नव्हे जिल्ह्यात नाव गाजलेले शैक्षणिक कोचिंग क्लासेस म्हणून उमा किरण या ठिकाणी क्लासेस घेतले जातात.लाखो रुपये देऊन पालक आपल्या मुलामुलींना विश्वासाने शिक्षणासाठी पाठवितात परंतु बाहेरचे सोडा आतील दोन हरामखोर शिक्षकच भक्षक झाल्याचे दिसून येत आहे. आतापर्यंत किती अल्पवयीन मुलीवर या दोन हरामखोरांनी हात घातलेला आहे. हे चौकशी दरम्यान कळेल पण त्या हरामखोरांना नागडं करून कोर्टात न्यायला पाहिजे होते. परंतु त्यांना पोलीस प्रशासनाने साधी हातकडी सुद्धा लावलेले नाही. त्याच्यामागे कोणाचे हात आहे. यांचा आका कोण आहे. त्याची चौकशी व्हायला पाहिजे. या दोन प्राध्यापकांना कठोर शिक्षा व्हायला पाहिजे. आणि शहरातील प्रत्येक कोचिंग क्लासेस सरकार म ान्य आहे का? याची पण चौकशी व्हायला पाहिजे. आणि कॉलेज शाळा या ठिकाणी जे मुले मुलींना छेडछाड करीत आहे यांच्यावर पण कारवाई झाली पाहिजे. तसेच पालकमंत्री साहेब. आपली पण जिम्मेदारी आहे की ,बीड जिल्ह्यात काय घडत आहे याकडे आपण लक्ष



दिले पाहिजे.

## राज्यात वाशिमच्या डॉक्टरांची कामगिरी ठरली सरस



प्रतिनिधी मंगेश खाडेवाशिम : मागील वर्षभरात राज्यात वाशिमच्या जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांची कामगिरी सरस ठरली आहे. रुग्णांना आजारातून ठणठणीत बरे करणारे डॉक्टर हे रुग्णांसाठी देवदूत ठरले असून, डॉक्टरांप्रति 'डॉक्टर डे'च्या पूर्वसंध्येला रुग्णांमधून कृतज्ञता व्यक्त होत आहे.दरवर्षी १ जुलै हा दिवस राष्ट्रीय डॉक्टर दिन म्हणून साजरा केला जातो. डॉक्टरांच्या निःस्वार्थ सेवेला मान्यता देणारा, त्यांच्या कार्याचे कौतुक करणारा हा दिवस. रुग्णांना केवळ औषध नव्हे, तर आशा आणि जीवदान देणारे डॉक्टर म्हणजे समाजाचे खरे रक्षणकर्ते. मागील वर्षभरात वाशिम जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेची कामगिरी राज्यात विशेषत्वाने सरस ठरली. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रेमकुमार ठोंबरे यांच्या नेतृत्वात राबविण्यात आलेल्या आरोग्य उपक्रमांमुळे जिल्ह्याने अनेकवेळा राष्ट्रीय आरोग्य निर्देशांकांमध्ये अव्वल स्थान पटकाविले होतेसरकारी रुग्णालयांनी कात टाकली असून, केल्याने जिल्हा सामान्य रुग्णालयात दररोज सरासरी १००० ते ११०० रुग्णांवर उपचार होत आहेत. ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांतूनही मोफत तपासणी व औषधोपचार सेवा दिली जाते. सरकारी डॉक्टरांप्रमाणेच खासगी डॉक्टरांनीही गंभीर रुग्णांना वेळेत उपचार देत त्यांचे प्राण वाचवले आहेत.२०२५च्या डॉक्टर दिनाची थीम 'मुखवटाच्या मागेः उपचार करणाऱ्यांना कोण बरे करते?' अशी आहे. ही थीम वैद्यकीय व्यावसायिकांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष वेधते. डॉक्टर हे केवळ सेवक नसून, तेही एक मानव आहेत, ज्यांना सहानुभूती, आधार आणि विश्रांतीची गरज असते. डॉक्टर ज्याप्रमाणे इतरांची काळजी घेण्यासाठी स्वतःला समर्पित करतात, त्याचप्रमाणे त्यांना पाठिंबा देण्याची आणि त्यांची काळजी घेण्याची गरज यावर यंदाची थीम भर देते.

## पोद्दार स्कूल मधील विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रातील कला गुणना दिला जातो वाव

दिनांक २८ रोजी शनिवारी सकाळी दहा वाजता पोदार इंटरनॅशनल स्कूल येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात पत्रकार व सोशल मीडिया यांच्यातील फरक व पत्रकारितेतील आपले भविष्य किंवा त्यामध्ये आपलं करिअर करता येईल का? असे अनेक प्रश्न घेऊन विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोद्दार इंटरनॅशनल स्कूल चे वैशिष्ट शिक्षणाच्या व्यतिरिक्त अनेक ऍक्टिव्हिटीज घेतल्या जातात जसे इंटरनॅशनल खेळ, वेगवेगळ्या कॉम्पिटिशन साठी मुलांना तयार केले जातं त्यासाठी मुली, मुलंही स्वतःहून समोर येतात अशाच ऍक्टिव्हिटी मध्ये विद्यार्थी मित्रांनी सोशल मीडिया च्या माध्यमातून आपले करिअर करता येईल का व त्यासाठी शिक्षणा व्यतिरिक्त काय लागेल याची माहिती या कार्यक्रमात देण्यात आली यावेळी मुलांनी स्वतःहून वेगवेगळ्या माध्यमाचा, सोशल मीडिया कडून मीडियाचा वापर करून अतिशय सु दर प्रकारे सादरीकरण करण्यात आले.



## संजय गांधी, श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांना मानधन तात्काळ वाटप करावे माजी आ. भीमराव धोंडे साहेब यांची जिल्हाधिकारी यांचेकडे केली मागणी

–आष्टी विधानसभा मतदार संघातील आष्टी,पाटोदा, शिरूर (कासार) तालुक्यातील १५ हजार ८२० लाभार्थ्यांना संजय गांधी स्वावलंबन योजना आणि श्रावणबाळ निराधार योजनेअंतर्गत गेल्या सहा महिन्यांपासून मानधन मिळत नाही.या वयोवृद्ध, विधवा आणि अपंग नागरिकांना उपजीविकेचे दुसरे साधन नाही.त्यामुळे त्यांना शासकीय मानधन मिळणे अत्यंत आवश्यक आहे.आष्टी तालुक्यातील ९ हजार १७०,पाटोदा तालुक्यातील २ हजार ४२९ आणि शिरूर (कासार) तालुक्यातील ४ हजार २२९ लाभार्थ्यांचे मानधनाचे प्रस्ताव प्रलंबित आहेत.यासर्व लाभार्थ्यांनी डीबीटी पोर्टलवर नोंदणी करूनदेखील



त्यांना मानधन मिळत नाही. त्यामुळे यांची उपासमार होत आहे.जिल्हाधिकारी बीड यांनी याबाबत आष्टी,पाटोदा आणि शिरूर (कासार) तहसीलदार यांनी याबाबत तात्काळ कार्यवाही करून मानधन वाटप करावे असे आदेश देण्यात यावेत असे निवेदन निवेदन माजी आ. भीमराव धोंडे यांनी कृषिदिन दि.१ जुलै रोजी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांना दिले आहे. जिल्हाधिकारी यांनी देखील तातडीने याबाबत कार्यवाही होईल असे आश्वासन दिले आहे. पाटोदा तालुक्यातील अनेक महत्वपूर्ण विषयावर सविस्तर चर्चा केली जिल्हाधिकारी यांनी ठोस कार्यवाही चे आश्वासन दिले,यावेळी माझ्यासाह रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, माजी उपसभापती देवीदास शेंडगे, माजी सभापती अनिल जायभाये, माजी सरपंच प्रफुल्ल सानप,उप संपादक उत्तम बोडखे,माजी सरपंच भागवत वारे उपस्थित होते.

----------------

## विद्यार्थी सुरक्षिततेसाठी नगरपंचायतीकडून सर्वतोपरी सहकार्य-राजूभैय्या जाधव

## सर्व खाजगी क्लासेसने सीसीटीव्ही बसवण्याच्या तातडीच्या सूचना

पाटोदा (प्रतिनिधी): बीड येथील उमाकिरण खाजगी कोचिंग शैक्षणिक संस्थेत घडलेल्या गैरप्रकारच्या घटनेनंतर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा अहिराणी वर आला असून पाटोदा शहरातील सर्व खाजगी कोचिंग क्लासेस संचालकांनी विद्यार्थी सुरक्षिततेची आवश्यक ती खबरदारी घेऊन ज्यांनी सीसीटीव्ही बसवलेले नाहीत त्यांनी तातडीने सीसीटीव्ही बसवून घ्यावेत आणि पाटोदा नगरपंचायतीकडून पुढील दीड महिन्यात सर्व प्रमुख रस्त्यांवरील चौकात सीसीटीव्ही बसवण्यात येतील विद्यार्थी सुरक्षिततेच्या संदर्भात आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सूचनेनुसार आवश्यक ते सर्व तपरी सहकारी नगरपंचायतीकडून केले



जाईल असे आश्वासन नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव यांनी दिले. पाटोदा नगरपंचायतीत सोम वार रोजी खाजगी कोचिंग क्लासेस सुरक्षितता संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली यावेळी शहरातील सर्व प्रमुख खाजगी कोचिंग क्लासेस संचालक उपस्थित होते यावेळी विविध सुरक्षिततेच्या मुद्यांवर चर्चा झाली या बैठकीस पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव गटशिक्षणाधिकारी धनंजय बोंदार्डे पाटोदा पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे माजी मुख्याध्यापक एल आर जाधव पत्रकार महेश बेदरे सय्यद साजिद तसेच क्लासेसचे संचालक अजय जोशी महाविद्यालयाचे प्रतिनिधी म्हणून प्राचार्य तुकाराम तुपे यांनी मनोगत व्यक्त केले यावेळी पोलीस प्रशासनाकडून सर्व शाळा आणि खाजगी कोचिंग क्लासेस यांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी किंवा आर कोड
देण्यात येईल हा किंवा कोड प्रत्येकाने क्लासेस शाळेच्या ठिकाणी भिंतीवर लावावा आणि विद्यार्थ्यांनी त्यावर काही तक्रार असेल तर माहिती द्यावी असे आवाहन पोलीस
निरीक्षक सोमनाथ जाधव यांनी केले तसेच पालकांनी देखील खाजगी कोचिंग क्लासेस संदर्भात विद्यार्थी पाठवताना आवश्यक ती चौकशी करून आणि खबरदारी घेऊन काळजी घ्यावी असे देखील आवाहन यावेळी करण्यात आले या बैठकीस शहरातील नागरिक पालक विद्यार्थी यांची प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थिती होती तर पुढील दीड महिन्यात संपूर्ण शहरातील चार प्रमुख चौकांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आम दार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली बसवून देऊ अशी ग्वाही नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव यांनी दिली.

# बीड प्रकरणाचा तपास आता वरिष्ठ महिला आयपीएस अधिकारी करणार; मुख्यमंत्र्यांची विधानसभेत घोषणा

## प्रकरण अतिशय गंभीर, आरोपी आणि त्यांना आश्रय देणारे, कुणालाही सोडणार नाही-देवेंद्र फडणवीस



मुंबई (दि. ०१) - माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी बीड शहरात घडलेल्या अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणी केलेल्या मागणीला राज्य सरकारने २४ तासातच मान्य केले असून, या संपूर्ण प्रकरणाचा तपास आता एका वरिष्ठ महिला आयपीएस दर्जाच्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक मार्फत केला जाणार असून, याबाबतची अधिकृत घोषणा राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळ सभागृहात केली आहे. बीड येथे घडलेले प्रकरण अतिशय गंभीर व माणुसकीला आणि शिक्षकी पेशाला काळीमा फासणारे आहे. या प्रकरणात अशाच प्रकारे आणखी काही मुलींचे देखील लैंगिक शोषण झाल्याची शंका नाकारता येत नाही, त्यामुळे असे प्रकार घडलेल्या मुलींनी आता स्वतःहून समोर येऊन तक्रार द्यावी, या प्रकरणाचा संपूर्ण छडा लागावा, यातील दोषी व त्यांना मदत करणारे तसेच त्यांना राजकीय किंवा सामाजिक बळ देणारे हे कोण आहेत, ते निष्पन्न व्हावेत व त्यांना कठोर शिक्षा व्हावी, ही सरकारची व नवनियुक्त डखढ समितीची भूमिका असेल, दोषी असलेल्या कुणालाही सोडले जाणार नाही, असे स्पष्ट शब्दात देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. धनंजय मु ंडे यांच्या सह आज सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार चेतन तुपे यांनीही आज हा मुद्दा विधानसभेत उपस्थित केला होता. दरम्यान या तपास पथकाला कालमर्यादा निश्चित करून दिली जाणार असून, त्यांनी दिलेल्या वेळेत तपास पूर्ण करणे बंधनकारक असणार आहे, असेही श्री फडणवीस म्हणाले. या घोषणेनंतर धनंजय मु ंडे यांनी आपण केलेली मागणी राज्य सरकारने २४ तासांच्या आत मान्य केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार तसेच उपुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले असून, या प्रकरणातील पीडितांना न्याय मिळेपर्यंत आपण हे प्रकरण लावून धरू असा निर्धार मु ंडेंनी व्यक्त केला आहे.

### लैंगिक छळ प्रकरणातील शिक्षकांची पोलीस कोठडी ५ जुलैपर्यंत वाढवली

बीड। प्रतिनिधी अल्पवयीन विद्यार्थिनीवर लैंगिक छळ केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या दोन शिक्षकांची पोलीस कोठडी वाढवण्यात आली आहे. आरोपी शिक्षक विजय पवार आणि प्रशांत खाटोकर यांना आज बीड येथील न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांची पोलीस कोठडी ५ जुलै २०२५ पर्यंत वाढवण्याचा आदेश दिला. या प्रकरणात दोन्ही आरोपींना याआधी दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. आज ती कोठडी संपल्यानंतर त्यांना पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने दोघांनाही पाच जुलैपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

# शिवदास क्षीरसागर सेवानिवृत्ती निमित्त सन्मान

सेवानिवृत्ती ही खरंतर सुरुवात आहे काही अशा क्षणांची ज्योत आहे सुख-समाधान आयुष्यात काहीतरी कर्तव्यपूर्ती केल्याची भावना यात आहे तुम्ही जीवनात केलेल्या परिश्रमाचे अधिष्ठान....! ३३ वर्षे १४ दिवस एकूण सेवा प्रदीर्घ सेवेनंतर आज आपण सेवा निवृत्त होत आहात. आजपर्यंत आपली सेवा निष्ठ ेने, प्रामाणिकपणे पार पाडत असताना आपले शिक्षण विभागाचे नाते दृढ व समृध्द होत गेले. आपण आपल्या सेवेशी, अनेकविध लोकांशी त्यांच्या स्नेहांशी, नालेवाईकांशी शिक्षणाच्या माध्यमातून दृढ होणारे नाते फुलविण्यासाठी तुम्हीच कारणीभूत ठरता. अनेकांचे जीवन आपण आपल्या सेवेच्या माध्यमातून समृध्द केल्याने त्यांच्या आशिर्वादाच्या बळावरच तूम्ही सुखी असाल... आता मागील आयुष्यात अर्धवट राहीलेल्या इच्छा, आकांक्षा पूर्ण करण्याची, आयुष्य नव्या उमेदीनं, उत्साहानं जगण्याची वेळ आलीय, आज सेवानिवृत्त होत असताना आपण कर्तव्यपूर्ती केल्याची जाणीव तुमच्या मनात जरुर असेल. आपल्या सेवेमध्ये ङ्गउणीवफनसल्याने ही ङ्गजाणीवफ महत्वाची.. शाळेच्या माध्यमातून



अनेकांची मने आपण जोडलीत. यापुढील जीवनाच्या वाटचालीत आपलेही मन आपले कुटु ंब, समाज व देशहीतासाठी जोडले जावो व आपले जीवन समृध्द होवो हीच सदिच्छा. आपल्याला सेवा निवृत्तीच्या लक्ष लक्ष शुभेच्छा...!

# उमाकिरण प्रकरणात कामरान खान यांची SIT चौकशीची मागणी



बीड प्रतिनिधी काही दिवसांपूर्वी बीड येथील उमाकिरण शिक्षण संकुलामध्ये एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आल्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात तीव्र संतापाची लाट उसळली होती. या घटनेतील आरोपी विजय पवार आणि खाटोकर यांच्याविरोधात स्वतंत्र व सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी शिवसेना अल्पसंख्याक विभागाचे जिल्हा प्रमुख कामरान खान यांनी महाराष्ट्र शासनाकडे केली होती. या मागणीला आमदार धनंजय मुंडे यांनी देखील पाठिंबा दिला. यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत या प्रकरणाची डखढ (विशेष तपास पथक) मार्फत चौकशी करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे पीडित कुटुंबाला न्याय मिळण्याची शक्यता बळावली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली, याबद्दल कामरान खान यांनी त्यांचे विशेष आभार मानले आहेत.



मा,ना, श्री रविंद्रजी चव्हाण साहेब यांची भारतीय जनता पार्टी पक्षाच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्ष पदी नियुक्ती झाल्यामुळे मनस्वी हार्दिक हार्दिक अभिनंदन शुभेच्छा द्वारकाधीश भवन धोंडीपुरा बीड

# बेकायदेशीर पिस्तूल बाळगणाऱ्या तिघांना शिवाजीनगर पोलिसांची शिताफीने कारवाई

बीड, दि. ०१ जुलै प्रतिनिधी शिवाजीनगर पोलीसांनी बेकायदेशीररीत्या अग्निशस्त्र बाळगणाऱ्या तीन संशयितांना अटक करत त्यांच्याकडून गावठी पिस्तूल तसेच गुन्ह्यात वापरलेली कार जप्त केली. या कारवाईने गुन्हेगारी प्रवृत्तींना मोठा दणका बसला आहे. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक किशोर पवार यांना धानोरा रोड परिसरात दोन इसम शस्त्रासह फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यांनी तात्काळ पथक तयार करून पंढरी कॉलनीजवळ सापळा रचला. त्या दरम्यान पांढऱ्या रंगाची ह्युंडाई XCENT गाडी (क्रमांक MH-०५-BJ-१९८८) आली. पोलिसांनी गाडी अडवून तपासणी केली असता त्यात आमोल



कल्याण पवार (वय २९, रा. घोडका राजुरी, ह.मु. बार्शी नाका, बीड) आणि बाबुराव मन्मथ वैराळे (वय ३३, रा. कदमवाडी, बीड) हे दोघे मिळून आले.तपास दरम्यान बाबुराव वैराळेच्या कमरेला एक गावठी बनावटीची पिस्तूल, ज्यास मॅगझीनही होते, असा अंदाजे ५०,००० रुपयांचा मुद्देमाल सापडला. पोलिसांनी तात्काळ ती पिस्तूल आणि संबंधित कार जप्त केली.पोलिसी चौकशीत या पिस्तुलाचा पुरवठा करणारा इसम राहुल प्रकाश तुपे (रा. आशा टॉकीज, धानोरा रोड, बीड) असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्यालाही त्याच्या राहत्या घरी सापडताच ताब्यात घेतले. विशेष म्हणजे, राहुल तुपे हा जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार बीड जिल्ह्यातून तडीपार असून, तडीपारीच्या काळात जिल्ह्यात परतल्यामुळे त्याच्यावर स्वतंत्र गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तिघांच्या आपराधिक पार्श्वभूमीचा तपास घेतला असता, आरोपी आमोल पवार याच्यावर वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात एकूण ८ गुन्हे, बाबुराव वैराळे याच्यावर २ गुन्हे, तर राहुल तुपे याच्यावर ७ गंभीर स्वरूपाचे गुन्हे नोंद असल्याची माहिती मिळाली आहे. हे गुन्हे प्रामुख्याने शरीराविरुद्ध तसेच अवैध शस्त्र बाळगण्याचे आहेत. ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक नवनित काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी कमलेश मीणा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक किशोर पवार, सहायक पोलीस निरीक्षक संदिप दुनगहु, गजानन क्षिरसागर, अब्दुलखय्युम कुरेशी तसेच त्यांचे सहकारी अधिकारी व अंमलदारांनी संयुक्तरीत्या ही यशस्वी कारवाई केली सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर धोत्रे करत आहेत.

# बीयरच्या बाटलीने डोक्यात फोडून रक्त सांडणारा गुंड अखेर गजाआड!

## शहर पोलिसांची दहशतीच्या अड्ड्यातच धिंड काढून कारवाई, नागरिकांनी वाजवले टाळ्या

### दहशत पेरणाऱ्याला, त्याच रस्त्यावर उभं करून लोकांनी पाहिलं तेव्हा पोलिसांचा दरारा किती जबरदस्त आहे हेच दिसलं!

प्रतिनिधी बीड शिवाजी चौकात किरकोळ धक्क्यावरून बिअरची बाटली डोक्यात फोडून एका तरुणाला गंभीर जखमी करणारा सराईत गुन्हेगार सागर संपतराव झेंडे (रा. बीड) पोलिसांच्या सापळ्यात अडकला. पोलिसांनी त्याला जेरबंद करून त्याच चौकातून हातकड्या घालून धिंड काढत दहशतीच्या माजावर पाणी फेरलं. काय घडलं होतं? २१ एप्रिल रोजी सायंकाळी फिर्यादी व्यक्ती घरी जात असताना शिवाजी महाराज चौकात आरोपी सागर झेंडेला किरकोळ धक्का लागल्याचा राग मनात धरला. संतप्त झेंडेंनी हातातील बिअरची बाटली फिर्यादीच्या डोक्यात फोडली. या हल्ल्यात फिर्यादी गंभीर जखमी झाला. त्या वेळी झेंडे फरार झाला होता. २४ एप्रिल रोजी पोलिसांनी कलम ११८(१), ११५(२), ३५२ नुसार गुन्हा दाखल केला, परंतु आरोपीचा पत्ता लागला नव्हता. गुप्त माहिती, पोलिसांची सर्जिकल स्ट्राइक शहर पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांना आरोपीच्या हालचालीबद्दल गुप्त माहिती मिळताच १ जुलै रोजी पथकाने कारवाई करत झेंडेला पकडलं. झेंडेवर यापूर्वीही मारहाणीचे गुन्हे दाखल असल्यामुळे पोलिसांनी त्याला सॉफ्ट ट्रीटमेंट दिली नाही., दहशतीच्या चौकातच धिंड , सागर झेंडेला अटक करून पोलिसांनी थेट शिवाजी महाराज चौकातूनच धिंड काढली.दहशत इथं केलीस, मग शिक्षा पण इथंच! अशा शब्दात पोलिस निरीक्षक बल्लाळ यांनी संदेश दिला. गर्दीत नागरिकांनी पोलिसांच्या या ठोस कारवाईचे कौतुक केले. आरोपीची मान खाली घालून चाललेली धिंड पाहून लोकांनी टाळ्यांनी प्रतिसाद दिला. गुंडगिरीला पोलिसांचा चाप सागर झेंडेसारख्या सराईत गुन्हेगारांना उघड रस्त्यावर धिंड काढून शिक्षा देण्यातून समाजात पोलिसांचा दबदबा टिकेल, असे नागरिक म्हणाले. या कारवाईमुळे इतर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांनाही संदेश गेला आहे. बघा, आता याच बातमीसोबत एक छोटी साइड बॉक्स न्यूज, म्हणजे पेपरमध्ये छापायची छोटी चौकट, आणि एक रंगीत शब्दातले नोट्सही देतो



शिवाजी चौकातून आरोपीची धिंड काढताना पोलिस निरीक्षक बल्लाळ आणि पथक

### गुंडगिरीचा हिसका आधीही दाखवला

सागर झेंडेला यापूर्वी देखील दोन वेळा मारामारीप्रकरणी अटक झाली होती. पोलिसांच्या नजरेत असतानाही त्याने पुन्हा गुन्हा केला. त्यामुळे यावेळी पोलिसांनी कडक धडा शिकवला.

### लोकांची प्रतिक्रिया

अशा धिंडीमुळे गुंडांना धडकी भरते, पोलिसांनी असाच कठोरपणा दाखवावा
शहरातील नागरिकांची प्रतिक्रिया
अशा धिंडीमुळे गुंडांना धडकी भरते, पोलिसांनी असाच कठोरपणा दाखवावा
शहरातील नागरिकांची प्रतिक्रिया

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादकः राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com